# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 16 October 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

पायाभूत सुविधांमध्ये महाराष्ट्र देशातलं पहिल्या क्रमांकाचं राज्य असल्याचं, मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत महायुतीच्या संयुक्त पत्रकार परिषदेत बोलत होते. गेल्या सव्वा दोन वर्षात महायुतीने केलेल्या कामांचं रिपोर्ट कार्ड समोर ठेवत असल्याचं त्यांनी सांगितलं. राज्याच्या क्षमतांचा पूर्णपणे वापर करुन विकासाला चालना दिल्याचं त्यांनी नमूद केलं. राज्यात अनेक प्रकल्प सुरु असल्याचं सांगून मुख्यमंत्र्यांनी भविष्यातल्या प्रकल्पांबाबतही माहिती दिली. उपमुख्यमंत्री तथा भाजप नेते देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख अजित पवार यावेळी उपस्थित होते. आपल्या सरकारनं राबवलेल्या योजनांचा आढावा घेत, त्यांनी मागच्या सरकारवर टीका केली.

****

राज्यात निवडणुका जाहीर झाल्यामुळे आता सर्वच पक्षांमध्ये राजकीय हालचालींना वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर आज नवी दिल्लीत भाजपा मुख्यालयात भाजपाच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक होणार आहे. या बैठकीत उमेदवारांच्या नावावर विचारमंथन केलं जाईल. दरम्यान, काँग्रेस पक्षाच्या केंद्रीय समितीची बैठक आज होणार असल्याचं वृत्त आहे.

****

दहशतवाद, फुटीरतावाद आणि उग्रवाद ही जगासमोरची मुख्यं आव्हानं असून, कट्टरता आणि दहशतवादाच्या मार्गानं कोणताही देश प्रगती करू शकत नाही, असा स्पष्ट इशारा परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी पाकिस्तानच्या भूमीवरून दिला आहे. ते आज इस्लामाबाद इथं तेवीसाव्या शांघाय सहकार्य संघटना अर्थात एससीओ च्या परिषदेला संबोधित करत होते. सीमेपलिकडून दहशतवाद होत असताना व्यापाराला प्रोत्साहन देता येत नाही, असंही परराष्ट्रमंत्र्यांनी बजावलं. भारतीय परराष्ट्र मंत्र्यांनी

पाकिस्तानला भेट देण्याची ही गेल्या नऊ वर्षातली पहिलीच वेळ आहे. दरम्यान, जयशंकर यांनी आज सकाळी, एक पेड मां के नाम या उपक्रमाचा एक भाग म्हणून इस्लामाबादच्या भारतीय उच्चायुक्त कार्यालयात अर्जुन वृक्षाचं रोप लावलं.

****

जम्मू-काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्स पक्षाचे नेते ओमर अब्दुल्ला यांनी आज मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. श्रीनगरमधल्या शेर-ए-काश्मीर इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटरमध्ये झालेल्या या सोहळ्यात नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी ओमर अब्दुल्ला आणि त्यांच्या मंत्रिमंडळाला पद आणि गोपनियतेची शपथ दिली. काँग्रेस पक्षानं सरकारमध्ये सामील न होता बाहेरून पाठिंबा देण्याचा निर्णय घेतल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. या शपथग्रहण समारंभाला काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव उपस्थित होते. दहा वर्षांनंतर इथं झालेल्या विधानसभा निवडणुकीत नॅशनल कॉन्फरन्स पक्षानं बहुमत मिळवलं आहे. दरम्यान, काँग्रेसनं गुलाम अहमद मीर यांची विधिमंडळ पक्षाचा नेता म्हणून निवड केली आहे.

****

केरळमधल्या वयानाड लोकसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी काँग्रेसनं प्रियंका गांधी यांना उमेदवादी जाहीर केली आहे. रायबरेली आणि वायनाड अशा दोन्ही ठिकाणहून विजयी झाल्यानंतर, राहुल गांधी यांनी वायनाड मतदारसंघाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे ही पोटनिवडणूक होत आहे.

****

आज जागतिक अन्नधान्य दिवस पाळला जात आहे. निरामय आयुष्य आणि उज्ज्वल भविष्यासाठी भोजनाचा अधिकार, ही या वर्षीच्या अन्नधान्य दिवसाची संकल्पना असल्याची घोषणा संयुक्त राष्ट्रसंघाच्या अन्न आणि कृषी संघटनेनं केली आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर इथली तुळजाभवानी देवी दसऱ्याच्या सीमोल्लंघनानंतरची श्रमनिद्रा पूर्ण करून अश्विन पौर्णिमा म्हणजेच कोजागिरी पौर्णिमेला पुन्हा सिंहासनारूढ होते. यानिमित्त लाखो भाविक देवीच्या दर्शनासाठी पायी येत असतात. त्यामुळे आज आणि उद्या तुळजापूर मार्गावरील वाहतुक वळवण्यात आली आहे. सर्व मार्गांवर वाहतुकीसंदर्भात दिशादर्शक फलक लावण्यात आलेले आहेत, भाविकांनी रस्त्याच्या डाव्या बाजूने चालावं, आणि हा उत्सव

सुरक्षित पार पाडावा, असं आवाहन धाराशिवचे जिल्हा पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी केलं आहे.

****

नांदेड जिल्ह्यात लोहा तालुक्यातल्या मारतळा इथं जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या वतीने जागतिक हात धुवा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी गावात जनजागृती कार्यक्रम राबवला. मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या आवाहनानुसार विद्यार्थ्यांनी आठवडी बाजारात जाऊन हात धुण्याच्या योग्य पद्धतींबद्दल माहिती दिली.

****

नांदेड विभागात येत्या २० तारखेपर्यंत तारुर ते रोटेगाव आणि परभणी ते पिंगली या स्थानकांदरम्यान लाईन ब्लॉक घेण्यात येणार आहे. यामुळे नगरसोल - रोटेगाव - नगरसोल ही रेल्वे गाडी आजपासून १९ ऑक्टोबर पर्यंत नगरसोल ते रोटेगाव स्थानकांदरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे. अमृतसर - नांदेड, काचीगुडा - नगरसोल, तसंच परळी - अकोला या गाड्या काही स्थानकांदरम्यान उशीरा धावणार असल्याचं दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड कार्यालयानं कळवलं आहे.

****